# स्मार्ट नाशिक सिटी

नाशिक महानगरपालिका खाजगी प्रकाशन

नाशिक वर्ष १, अंक ७ मासिक वृत्तपत्रिका सप्टेंबर २०१७


# सुंदर नाशिक स्वच्छ नाशिक महास्वच्छतेतून जनजागृती

## शहर स्वच्छता मोहिमेत साडेतीनशे टन कचरा संकलित; पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत शुभारंभ

**नाशिक** : नाशिक शहराचे स्वच्छ नाशिक सुंदर नाशिक या ब्रिद वाक्याप्रमाणे स्वच्छ होण्यासाठी पालकमंत्री गिरिश महाजन यांच्या शालीमार येथून स्वच्छ नाशिक या मोहिमेस प्रारंभ केला. शासनाच्या निर्देशनानुसार महापालिका आणि जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संयुक्त विद्यमाने शहरात राबविण्यात आलेल्या विशेष स्वच्छता मोहिमेत हजारो नागरिकांनी, पालकमंत्री व मान्यवरांच्या समवेत स्वच्छ नाशिक करण्याची शपथ घेतली.

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची १५० व्या जयंतीनिमित्त सबंध देशात महास्वच्छता अभियान मोहिम दि. १५ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत स्वच्छता हीच सेवा हा उपक्रम राबविण्यात आला. या पार्श्वभूमीवर नाशिक मध्ये विशेष स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. स्वाईन फ्लु, डेंग्यु, मलेरिया आदी प्रकारच्या आजारापासून शहर मुक्त करण्यासाठी नागरिकांनी परिसराची स्वच्छता राखावी आणि वर्षभर कर्तव्यभावनेने स्वच्छता उपक्रम राबवावेत, असे आवाहन राज्याचे वैद्यकिय शिक्षण, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीष महाजन यांनी यावेळी केले.

यावेळी कार्यक्रमात पालक मंत्री यांनी सांगितले की, नागरिकांनी पंधरवडा स्वच्छता अभियाना बरोबरच नियमितपणे स्वच्छतेबाबत जागृत राहणे गरजेचे असून पाश्चात्य देशात चॉकलेट खाल्यानंतर त्याचा कागदही रस्त्यावर टाकत नाही ते घरी आणून कचराकुंडीत टाकतात. त्यामुळे सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न निर्माण होत नाही. त्यामुळेच सर्वांना आपल्या घरापासून ते रस्त्यापर्यंत स्वच्छतेचे व्रत हाती घेणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले.



याप्रसंगी पालकमंत्री गिरीष महाजन यांनी स्वच्छते विषयक शपथ देऊन आकाशात फुगे सोडून या मोहिमेस प्रारंभ केला. या कार्यक्रमास स्वच्छ भारत अभियानाचे ब्रॅण्ड ॲम्बेसिडर आंतरराष्ट्रीय धावपटु कविता राऊत, सावंत बंधु, अशोक दुधारे, प्रसाद पवार, आदींचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी नाशिक मनपाचे महापौर रंजना भानसी उपस्थित होत्या. तर कार्यक्रमाचे प्रास्तविक आरोग्य वैद्यकिय अधिकारी डॉ. सुनिल बुकाणे, यांनी स्वच्छते विषयक कार्यक्रमाची माहिती विषद केली. या कार्यक्रम प्रसंगी आमदार बाळासाहेब सानप, देवयानी फरांदे, सीमा हिरे, महंत भक्तीचरणदास, विभागीय आयुक्त महेश झगडे, मनपा आयुक्त अभिषेक कृष्णा, जिल्हाधिकारी राधाकृष्ण बी. पोलीस आयुक्त रविंद्रकुमार सिंघल, उपमहापौर, प्रथमेश गिते, सभापती स्थायी समिती शिवाजी गांगुर्डे, सभागृह नेता दिनकर पाटील, गटनेता संभाजी मोरूस्कर, आरोग्य सभापती सतिश कुलकर्णी, अतिरिक्त आयुक्त रमेश पवार, किशोर बोर्डे, उपायुक्त हरीभाऊ फडोळ, शहर अभियंता यु.बी. पवार, उपजिल्हाधिकारी मंगरूळे, जिल्हा माहिती अधिकारी डॉ. किरण मोघे, आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे डॉ. चव्हाण, स्वप्निल तोरणे, अग्निशमनदल प्रमुख अनिल महाजन, जनसंपर्क अधिकारी यशवंत ओगले, प्रशासन अधिकारी नितीन उपासनी, मनपा पदाधिकारी, सभापती, नगरसेवक नगरसेविका, सामाजिक, सांस्कृतिक शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर निमा आयमाचे प्रतिनिधी, स्काऊट गाईड प्रतिनिधी विद्यार्थी आणि विद्यार्थीनी आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गोपीनाथ हिवाळे यांनी तर आभार राजेंद्र मोरे यांनी मानले.

महानगरपालिका कार्यक्षेत्रात ४४९ ठिकाणी विशेष महास्वच्छता अभियान राबविण्यात येऊन महास्वच्छता अभियांनातर्गत एकूण साधन सामुग्री व एकुण संकलित कचरा महास्वच्छता अभियांनात सहभागी सामजिक संस्था, अधिकारी व कर्मचारी, सर्वसामान्य नागरिक यांचा मोठा सहभाग स्वच्छता अभियानात होता.

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत ‘स्वच्छता हिच सेवा’ मोहिमेत सहभागी साधनसामग्री व संकलीत कचऱ्याचा अहवाल

| अ. क्र. | विभाग | एकूण वाहन | | | | एकूण अंदाजे कचरा संकलन | ब्लॅक स्पॉट |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | जेसीबी | डंप्पर | घंटागाडी | ट्रॅक्टर | | |
| १ | नाशिक पूर्व | ५ | ५ | २७ | ५ | ७२ टन | ६० |
| २ | नाशिक पश्चिम | ३ | ३ | ९ | ६ | ५१ टन | ७९ |
| ३ | नाशिकरोड | ६ | ६ | १२ | ५ | ३८ टन | ९० |
| ४ | सातपूर | ५ | ५ | ३० | ५ | ६९.५ टन | १२० |
| ५ | सिडको | ६ | १२ | १२ | ६ | ५०.५ टन | ४३ |
| ६ | पंचवटी | ८ | १० | २७ | ३ | ७१.५ टन | ६० |
| | एकूण | ३३ | ४१ | ११७ | ३० | ३५२.५ टन | ४५२ |

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत ‘स्वच्छता हिच सेवा’ मोहिमेत उपस्थित कर्मचारी, विद्यार्थी, नागरिक यांचा सहभाग अहवाल

| अ. क्र. | विभाग | एकूण सहभागी कर्मचारी | एकूण सहभागी विद्यार्थी | | | एकूण सहभागी नागरिक | एकूण कर्मचारी विद्यार्थी नागरिक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | संस्था | शाळा | विद्यार्थी | | |
| | | १ | २ | ३ | ४ | ५ | १+४+५ |
| १ | नाशिक पूर्व | ५३६ | १८ | २ | २०० | ८६५ | १६०१ |
| २ | नाशिक पश्चिम | ५४८ | २१ | ३६ | ५८५३ | १४०५ | ७८०६ |
| ३ | नाशिकरोड | ७८७ | ११५ | ३४ | ३६०२ | ५३१ | ४९२० |
| ४ | सातपूर | ४८४ | १९ | २४ | ४१३१ | १३५२ | ५९६७ |
| ५ | सिडको | २६० | ८ | १८ | १९४० | ८५२ | ३०५२ |
| ६ | पंचवटी | ५४० | १३ | २८ | ४०१५ | ९१८ | ५४७३ |
| | एकूण | ३१५५ | १९४ | १४२ | १९७४१ | ५९२३ | २८८१९ |

**२२ सप्टेंबर :** शालिमार चौक येथे विशेष स्वच्छता मोहिमेस प्रारंभ.

**२३ सप्टेंबर :** शहरात डेंग्यू सर्वेक्षण करून जनतेत प्रबोधन करण्यात आले.

**२४ सप्टेंबर :** सार्वजनिक कार्यालय व सामाजिक संघटनांचा अभियानात सहभाग.

**२५ सप्टेंबर :** हॉस्पिटल, उद्यान, पुतळे, स्मारक, बसथांबे, तलाव व स्वच्छतागृह सफाई करण्यात आले.

**२६ सप्टेंबर :** शाळा, महाविद्यालय, प्राथमिक शाळा, अंगणवाडी व पटांगण परिसरात स्वच्छता मोहिम राबविण्यात आली.

**२७ सप्टेंबर :** वाणिज्य, व्यापारी क्षेत्र, औद्योगिक क्षेत्र, अंबड, सातपूर, भाजीबाजार येथे स्वच्छता मोहिम राबिविण्यात आली.

**२८ सप्टेंबर :** ऐतिहासिक ठिकाणे, पर्यटनस्थळे, धार्मिकस्थळे, रामकुंड, गोदावरी येथे स्वच्छता मोहीम राबिण्यात आली.

**२९ सप्टेंबर :** सर्व बसस्थानके, रेल्वेस्थानक, बसथांबे, उड्डाणपूल व परिसरात स्वच्छता मोहीम.

**०१ ऑक्टोबर :** शहरातील प्रसिद्ध स्थळांवर स्वच्छता मोहिम.

**०२ ऑक्टोबर :** महात्मा गांधी जयंतीनिमित्त शासन निर्देशनानुसार सर्वसधारण स्वच्छता व आदी कामकाज करणे.









# पर्यावरण पुरक गणेशोत्सव संकल्पनेला प्रतिसाद - महापौर भानसी

**नाशिक :** महापालिका क्षेत्रातील गणेशोत्सव २०१७ च्या अनुषंगाने गणेश विसर्जना करीता मनपातर्फे २६ ठिकाणी नैसर्गिक तर २८ ठिकाणी कृत्रिम तलाव करण्यात आले होते. पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी मुर्ती दान करण्याचे आवाहन गणेश भक्तांना महापालिकेकडून करण्यात आले होते. गणेशमुर्ती दान करणाऱ्यांसाठी स्वतंत्र संकलन केंद्र उभारण्यात आली तसेच संकलना करीता आवश्यक वाहनांची व्यवस्था करण्यात आली होती.

श्री गणेश विसर्जनाच्या पार्श्वभुमीवर महापालिकेच्या विविध विभागाचे अधिकारी कर्मचारींची नियुक्ती सर्व विसर्जनाच्या ठिकाणी करण्यात आली होती. तसेच गणेश विसर्जनाचे नियोजन महापालिकेतर्फे पूर्ण करून विसर्जन मिरवणुकीच्या मार्गावरील अतिक्रमणे काढण्यात आले होते. आयुक्त अभिषेक कृष्णा यांनी गणेश विसर्जन मिरवणुकी मार्गाचा आढावा घेवून नदीकाठची तसेच नैसर्गिक व कृत्रिम विसर्जन स्थळांची पाहणी केली. पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने व नदीपात्रांचे जलप्रदुषण होऊ नये याकरीता नागरिक, गणेश मंडळे, प्राथमिक शाळा, विद्यालये, महाविद्यालये तसेच महापालिका यांनी पर्यावरण पुरक गणेशोत्सव संकल्पनेला प्रतिसाद देऊन शाडू मातीच्या बनविलेल्या श्री गणेशमुर्तींची प्रतिष्ठापना करावी याकामी स्थानिक वर्तमान पत्रात महापौर रंजना भानसी यांच्याकडून जाहीर आवाहन प्रसिद्ध करणेत आले. तसेच नागरिकांनी श्री गणेशमुर्ती दान स्वरूपात देणे, निर्माल्य कलशात निर्माल्य जमा करणे. आणि स्वयंसेवी, शैक्षणिक व सामाजिक संस्था यांनाही या उपक्रमात सहकार्य करणे बाबत वर्तमानपत्रात तसेच शहरातील विविध ठिकाणी व श्रींच्या विसर्जनाच्या ठिकाणी डिजीटल बॅनर्स लावण्यात आले होते. गणेश विसर्जन मिरवणुकीसाठी महिला भक्तांची होणारी गर्दी लक्षात घेत महापालिकेच्या आरोग्य विभागाने हॉटेल संघटनेला पत्र देऊन मिरवणुकीच्या दिवशी मिरवणूक मार्गावरील हॉटेलची स्वच्छतागृहे महिलांसाठी मोफत उपलब्ध करून देण्यात आली होती. याशिवाय अमोनियम बायकार्बोनेटची पावडर मनपा तर्फे मोफत उपलब्ध करून देण्यात आली होती.

महापालिकेतर्फे विसर्जन स्थळावर अनुचित प्रकार घडू नये यासाठी १३३ जीवरक्षक तैनात करण्यात आले होते. शहराच्या हद्दीत महापालिकेसह विविध शैक्षणिक, स्वयंसेवी व सामाजिक संघटनांकडून राबविण्यात आलेल्या मुर्तिदान केंद्रावर १ लाख ६९ हजार गणेश मुर्तींचे संकलन झाले. दिवसभरात १३१ मेट्रिक टन निर्माल्य संकलित करण्यात आले. साडेचार टन अमोनियम कार्बोनेटचा वापर करण्यात आला सहा विभागांत ५४ ठिकाणी गणेशमुर्ती संकलन केंद्र उभारण्यात आले होते.

**नैसर्गिक व कृत्रिम तलावांची ठिकाणे**

| अ. क्र. | विभाग | नैसर्गिक ठिकाणे | कृत्रिमे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | नाशिक पूर्व | ४ | ६ |
| २ | पश्चिम | ५ | ७ |
| ३ | पंचवटी | ६ | ३ |
| ४ | नाशिकरोड | ५ | ४ |
| ५ | नवीन नाशिक | ५ | ४ |
| ६ | सातपूर | १ | ४ |
| | एकूण | २६ | २८ |

**गणेश विसर्जन २०१७ गणेश मूर्ती संकलन आणि निर्माल्य**

| अ. क्र. | विभाग | मुर्ती संकलन | निर्माल्य गाडी | निर्माल्य वजन (टन) |
|---|---|---|---|---|
| १ | नाशिक पूर्व | ९३७२ | ८ | २० |
| २ | पश्चिम | २५९०७ | ८ | १७.६ |
| ३ | पंचवटी | ४६५०७ | १६ (छोट्या) | १६ |
| ४ | नाशिकरोड | १४३६३ | १३ | २४ |
| ५ | नवीन नाशिक | २५५९९ | १० | २० |
| ६ | सातपूर | ४८२०९ | २० | ३५ |
| | एकूण | १६९९५७ | ७५ | १३१.६ |

## शहरात ठिकठिकाणी श्री गणेश विसर्जन २०१७ ची पूर्वतयारी व विसर्जन मिरवणूकीतील काही क्षणचित्रे






















# विशेष मिशन इंद्रधनुष्य मोहिमेंतर्गत लसीकरण सप्ताह

**नाशिक :** शहरातील मनपाच्या सर्व रूग्णालयांमध्ये तसेच सहाही विभागीय कार्यालयांत ० ते २ वर्षाखालील बालकांना गरोदर मातांना लसीकरण करण्यासाठी विशेष मिशन इंद्रधनुष्य मोहिम कक्ष स्थापन करून या मोहिमेंतर्गत लसीकरण करण्याचे आदेश महापौर रंजना भानसी यांनी दिले.

मनपा आयुक्त यांच्या दालनाशेजारी टास्क फोर्स कमिटीची बैठक झाली. विशेष मिशन इंद्रधनुष्य मोहिम महापालिका कार्यक्षेत्रात



राबविण्यात येणार आहे. त्यात ० ते २ वर्षांखालील बालककांचा व गरदोर मातांच्या लसीकरणाचा आढावा घेण्यात आला. वंचित बालकांना आणि गरोदर मातांना लसीकरण करण्यात आले. ऑक्टोबर २०१७ ते जानेवारी २०१८ या महिन्यांतील दर दि. ७ ते १४ तारखेपर्यंत बालकांना व मातांना लसीकरण करण्यासाठी विशेष लसीकरण सप्ताह मनपा वैद्यकीय विभागांतर्गत असलेल्या शहरी प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत आयोजित करण्यात येणार असून जास्तीत जास्त प्रमाणात जनजागृती करण्यात यावी असे आदेश महापौर रंजना भानसी यांनी केले. मनपा शाळेतील व सामान्य कुटुंबातील मुलांना व पालकांना या योजनेविषयी माहिती देऊन मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात यावी असे आदेश महापौर रंजना भानसी यांनी दिले. यावेळी मिशन इंद्रधनुष्यअंतर्गत टास्क फोर्स कमिटीच्या बैठकीत महापौर रंजना भानसी यांनी मार्गदर्शन केले. त्यांच्यासह बैठकीत डॉ. विजय डेकाटे, नितीन उपासनी आदी उपस्थित होते.

# विभागीय कार्यालय दौरा : अडचणी व समस्या सोडवणार

**नाशिक :** नाशिक मनपाच्या विभागीय कार्यालया अंतर्गत येणाऱ्या अडचणी व समस्या जाणुन घेणेसाठी प्रभाग स्तरावर महापौर रंजना भानसी यांच्या प्रमुख उपस्थितीत सातपुर, नविन नाशिक विभागीय कार्यालय येथे बैठकी झाल्या. सातपुर प्रभागाच्या बैठकीत मांडलेल्या अडचणी त्वरित सोडवून त्याचा अहवाल सादर करावा असे आदेश सबंधीत विभागप्रमुखांना दिले अन्यथा सबंधीतांवर कारवाई करण्यात येईल असे महापौर रंजना भानसी यांनी स्पष्ट केले.

सातपूर विभागीय कार्यालयात महापौर रंजना भानसी यांच्या उपस्थितीत बैठक झाली. या बैठकीत सदस्यांनी विभागासाठी नवीन कार्यालय उभारणी करणे, उघड्यावरील मांस विक्री बंद करणे, मोकाट जनावरे, कुत्र्यांचा बंदोबस्त करणे, स्वच्छ व सुरळीत पाणीपुरवठा करण्याच्या दृष्टीने उपाययोजना करणे, परिसरातील भंगार बाजार पुन्हा होऊ नये याबाबत उपाययोजना करणे, विभागातील सर्वच प्रभागातील रस्त्यांवरील खड्डे बुजविणे सातपूर विभागात औषधे फवारणी करून पेस्ट कंट्रोलबाबत उपाययोजना व्हावी अनेक भागात पथदीपांची व्यवस्था करावी, घंटागाडीद्वारे साठलेला कचरा उचलण्याची व्यवस्था करावी, तसेच ठिकठिकाणी पडलेला पालापाचोळा उचलणे, उद्यान





विभागासाठी मोठे प्रकल्प राबवण्याची मागणी यावेळी करण्यात आली. त्यात मत्स्यालय उभारणी, सायकलिंग ट्रॅक यासारखे मोठे प्रकल्प राबवावे झाडांच्या फांद्या तोडणे त्यामुळे पथदीपांचा प्रकाश रस्त्यावर पडेल या दृष्टीने उपाय योजना करणे उद्यानांच्या देखभालीबाबत नियोजन करावे खेळाचे मैदान होण्याच्या दृष्टीने उपाय योजना कराव्यात, उघड्या गटारींवर ढापे टाकणे ज्या गटारीचे चेंबर उघडे आहेत त्याच्यावर ढापे टाकणे अनेक भागातील गटारींची चेंबर तुबलेले असून ते स्वच्छ करण्यात यावे विभागातील अंगणवाड्यांची दुरुस्ती करावी स्मशानभूमी व दफनभूमी याबाबत विषयाला प्राधान्य द्यावे. विभागात प्लंबरकडून परस्पर नळ कनेक्शन दिले जाते त्याबाबत संबंधितांवर कारवाई करावी मोकळे भूखंडांवर मोठ्या प्रमाणावर कचरा पडतो त्या ठिकाणी संबंधित मालकांना नोटिसा देण्याची व्यवस्था करावी असे विविध प्रश्न यावेळी सातपूर विभागातील नगरसेवक नगरसेविकांनी बैठकीत मांडले या बैठकीत महापौर रंजना भानसी यांनी विभागात सुरळीत पाणीपुरवठा करावा, रस्त्यांना पडलेले खड्डे त्वरित बुजवावे, जे रस्ते नव्याने झाले आहेत त्यांना तीन वर्ष पूर्ण झाली नाहीत त्या रस्त्यांवरील खड्डे संबंधित मक्तेदाराकडून बुजवावे व तसे नियोजन करावे खेड्यांची स्वतंत्ररित्या नियोजन केले असून त्याबाबतचे प्रस्ताव सादर करावे नगरसेवकांच्या कुठल्याही तक्रारी येता कामा नये सदस्यांनी केलेल्या तक्रारींचे निराकरण करावे तक्रारी सोडवण्यास अधिकाऱ्यांनी दिरंगाई केल्यास त्यांच्यावर त्वरित कारवाई केली जाईल असेही महापौर रंजना भानसी यांनी स्पष्ट केले प्राधान्यक्रम ठरवून कामाबाबतचे सदस्यांनी प्रस्ताव त्वरित तयार करावा अश्या सूचना यावेळी अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. प्रत्येक प्रभागासाठी दोनशे एलईडी दिवे देण्याची व्यवस्था करण्यात येणार असल्याचे महापौर रंजना भानसी यांनी स्पष्ट केले सातपूर प्रभागात झालेल्या बैठकीत प्रभाग सभापती माधुरी बोलकर विभागीय अधिकारी निर्मला गायकवाड यांच्यासह विभागातील सर्व नगरसेवक नगरसेविका, विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

मनपाच्या नवीन नाशिक सिडको विभागीय कार्यालयात महापौर रंजना भानसी यांच्या उपस्थितीत बैठक पार पडली विभागातील बैठकीत नगरसेवक नगरसेविकांनी विविध प्रकारच्या सूचना मांडल्या त्यामध्ये विभागासाठी स्वतंत्र कार्यकारी अभियंता दर्जाचा अधिकारी नेमावा, त्यांना पाच लाखांचे पर्यंतचे अधिकार देण्यात यावे, विभागासाठी सफाई कर्मचाऱ्यांची संख्या वाढवावी, गवत काढणे, पथदीप दुरुस्ती करणे, वैकुंठरथ स्वतंत्र उपलब्ध करून द्यावा, उद्यानांची देखभाल व्हावी, परिसरातील पाणीपुरवठा सुरळीत व्हावा नवीन भागात भुयारी गटार योजना राबवावी परिसरातील विद्युत तारा भूमिगत कराव्या ज्या परिसरात छोटे रस्ते आहेत त्या ठिकाणी स्वतंत्र छोट्या घंटागाड्यांची व्यवस्था करावी परिसरात अतिक्रमण वाढत आहे ते वेळीच थांबविण्यात यावे परिसरात डासांचा मोठ्या प्रमाणावर प्रादुर्भाव वाढला असून परिसरात औषधांची फवारणी करावी त्या औषधांचा दर्जा तपासावा खत प्रकल्पामुळे मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरलेली असून परिसरातील विहिरींना दुर्गंधीयुक्त पाणी आहे . नवीन नाशिक विभागाला पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध करून द्यावा अश्या विविध सूचना मांडल्या.या बैठकीस उपमहापौर प्रथमेश गिते,स्थायी समिती सभापती शिवाजी गांगुर्डे, सभागृह नेते दिनकर पाटिल, नगरसेवक-नगरसेविका, नगरसचिव ए.पी. वाघ, सहाय्यक नगरसचिव गोरख आव्हाळे, जनसंपर्क अधिकारी यशवंत ओगले यांचेसह सर्व खाते प्रमुख व अधिकारी उपस्थित होते.

# क्षयरूग्णांसाठी गांधी रूग्णालयात टी मेड मशीनचे उद्घाटन

**नाशिक :** महापालिकेच्या हद्दीत असलेल्या क्षयरोग रूग्णांसाठी मनपाच्या इंदिरा गांधी रूग्णालयात नाशिक महानगर पालिका व टि. सी.एस., डिस्क यांच्या संयुक्त विद्यमाने विकसीत केलेल्या औषधी चे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून नाशिक महापालिकेचे आयुक्त अभिषेक कृष्णा, आरोग्य वैद्यकिय समितीचे सभापती सतिश कुलकर्णी, आरोग्य वैद्यकिय समितीचे उप सभापती योगेश शेवरे, पंचवटी प्रभाग समितीचे सभापती प्रियंका माने, नगरसेवक, जगदीश पाटील, सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग कार्यक्रमाचे डेप्युटी एस.टी.ओ. शरद पाटील, इंडोलाईन इंडस्ट्रीजच्या स्वप्ना पाटील, इनामदार, जोशी, आरोग्य वैद्यकिय अधिकारी डॉ. विजय डेकाटे, आदी मान्यवर उपस्थित होते.

इंदिरा गाधी रुग्णालय, पंचवटी येथे नाशिक महानगरपालिका, व टि.सी.एस. डिस्क यांनी संयुक्त विदयमाने विकसीत केलेल्या टि. मेड मशिनचे उदघाटन करण्यात आले. या मशिनव्दारे क्षयरोगी दररोज औषध घेत आहे किंवा नाही याचे मॉनिटरींग करणे सोपे झाले आहे. क्षयरुग्णांना या मशिन मध्ये १४ दिवसांची औषधे लोड करुन देण्यात येणार आहे. क्षयरुग्णाला दररोज हि औषधे घेण्यासाठी ठरलेल्या वेळेत गजर वाजणार आहे. सदर गजरा नंतर रुग्णाने औषधे घ्यावयाची आहे. हि औषधे घेतल्या नंतर प्रशासनास रुग्णाने औषधे घेतल्याचे सिग्नल मिळणार आहे. जर कोणत्या कारणास्तव रुग्णाने औषधे घेतली नाही तर आरोग्य कर्मचा-यांना एस.एम.एस व्दारे कळणार आहे कि, रुग्णाने औषधे घेतली नाहीत व आरोग्य कर्मचारी त्याच्या घरी जावुन रुगास औषधे घेण्यास प्रवृत्त करेल. टी मेड मशिन सध्या ३० रुग्णाना देण्यात आले आहेत. जानेवारी २०१८ मध्ये १०० रुग्णांना देण्यात येतील. एम.डी. आर. क्षयरुग्णांसाठी आरोग्य वर्धीनी नावाची पोषक आहार देण्याची योजना सुरु करण्यात आली आहे.




हि योजना नाशिक महानगरपालिका व इंडोलाईन इडस्ट्रीज यांच्या संयुक्त विद्यमाने सुरु करण्यात आली आहे. अति गंभीर क्षय रुग्णांना दोन वर्षांसाठी जवळ जवळ १३ प्रकारच्या गोळ्या घ्याव्या लागतात. हे रुग्ण अतिक्षय गरीब व दुर्बल असतात. योग्य तो आहार घेण्यासाठी व रुग्णांकडे पैसा नसतो म्हणुन अशा रुग्णांना हायप्रोटिन डायट दिल्यास त्यांच्या प्रकृतीत सुधारणा होऊन ते उपचाराला योग्य तो प्रतिसाद देतात. याच उद्देशाने या रुग्णांसाठी दर महिन्याला ५ कि.लो आटा, १ किलो मुगदाळ, १ किलो चनादाळ, १ किलो मटकी, १ लिटर शेंदाणा तेल आदी धान्य इंडोलाईन इंडस्ट्रीज तर्फे देण्यात येणार आहे.

# विशेष समितींच्या अडचणी व समस्या सोडवणार – महापौर





**नाशिक** : नाशिक महापालिकेच्या विशेष समित्यांच्या अंतर्गत येणाऱ्या अडचणी व समस्या जाणुन घेणे साठी महापौर रंजना भानसी यांच्या प्रमुख उपस्थितीत स्थायी समिती सभागृहात बैठक झाली .या बैठकीत समित्यांनी मांडलेल्या अडचणी त्वरित सोडवून त्याचा अहवाल सादर करायचे आदेश सबंधीत विभाग प्रमुखांना दिले. अन्यथा सबंधीतांवर कारवाई करण्यात येईल असे महापौर रंजना भानसी यांनी स्पष्ट केले.

मनपाच्या महिला व बालकल्याण समिती, शहर सुधारणा समिती, विधी समिती, वैद्यकीय सहाय्यक व आरोग्य समिती या समित्यांच्या अडचणी समितीचे सभापती, उपसभापती व समिती सदस्य यांनी मांडल्या त्यात महिला व बालकल्याण समिती मध्ये प्रशिक्षण, सकस आहार, बचत गट यांना कर्ज व रोजगार त्वरित उपलब्ध व्हावे अंगणवाडीच्या इमारती दुरुस्ती करणे, पाणी, स्वच्छतेबाबत नियोजन करावे, पटसंख्या आदि बाबत सूचना सभापती सरोज आहेर व सदस्यानी मांडल्या. विधी समिती बाबत १० लाखा पर्यंत समितीला अधिकार दयावे, भुसंपादनचे टी. डी. आर. देणे, या विषयाबाबत समितीला अधिकार देण्याबाबत सभापती शितल माळोदे व सदस्य यांनी सूचना मांडली.

शहर सुधार समितीला कुणीही अधिकारी नाहीत त्वरित अधिकारी नियुक्ती करण्याची मागणी सभापती भगवान दोंदे यांनी केली. वैद्यकीय सहाय्यक व आरोग्य समिती सभापती सतीष कुलकर्णी यांनी आरोग्य व वैद्यकीय विभागात असणाऱ्या अडचणी स्पष्ट केल्या हॉस्पिटल परिसरात मोठ्या समस्या असून त्या सोड़वाव्यात.

विभागला पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध करून द्यावा अश्या विविध सूचना मांडल्या. या बैठकीत सभागृह नेते दिनकर पाटील यांनी सूचना मांडल्या. बैठकीस उपमहापौर प्रथमेश गीते, स्थायी समिती सभापती शिवाजी गांगुर्डे, सभागृह नेते दिनकर पाटिल, सर्व समिती सभापती, उपसभापती व सदस्य तसेच अतिरिक्त आयुक्त किशोर बोर्डे, रमेश पवार यांचे सह सर्व खाते प्रमुख व अधिकारी उपस्थित होते.

## मनपा शिक्षण विभागाच्या वतीने आदर्श शिक्षण पुरस्कार घोषित

**नाशिक** : मनपातर्फे शिक्षक दिनाच्या पुर्वसंध्येला आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी एकूण ३० प्रस्ताव प्राप्त करण्यात आले असून त्यापैकी १३ मनपा शाळांना तर ७ खासगी शाळांमधील शिक्षकांना देण्याचे घोषित केले. तसेच पुरस्कारासाठी निवड करतांना निवड समिती सदस्यांनी शिक्षकांचे शैक्षणिक, सामाजिक योगदान लक्षात घेवून निवड करण्यात आली; परंतु ज्यांचे प्रस्ताव आलेले नाही आणि कार्य चांगले आहे. अशा शिक्षकांची देखिल समितीने दखल घेवून निवड केली. पुरस्कार निवड समितीत राष्ट्रपती पारितोषिक विजेते मुख्यध्यापक वि.का. धनाईत, राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक साहेबराव महानुभाव, मनपातील शिक्षक विभागाच्या अधिक्षक मंगला शिंदे, चंद्रकांत थोरात यांचा समावेश होता. आयुक्त अभिषेक कृष्णा यांनी आदर्श शिक्षक पुरस्कार घोषित केले.

**आदर्श शिक्षक पुरस्कार मानकरी**

| पुरस्कार प्राप्त शिक्षक | पद | शाळेचे नाव किंवा क्रमांक |
|---|---|---|
| शोभा वाजे | मुख्याध्यापिका | विद्यानिकेतन १३ |
| रंगनाथ चव्हाण | मुख्याध्यापक | मनपा शाळा क्र. ३२ |
| नंदा शेळके | मुख्याध्यापिका | मनपा शाळा क्र. १२७ |
| अंजली तांबे | उपशिक्षिका | मनपा शाळा क्र.१९ |
| दत्तात्रय सूर्यवंशी | उपशिक्षक | मनपा शाळा क्र.२८ |
| संगीता धनवटे | उपशिक्षिका | मनपा शाळा क्र.९५ |
| जयश्री रकिबे | उपशिक्षिका | मनपा शाळा क्र.८७ |
| विजय कवर | उपशिक्षक | मनपा शाळा क्र.७२ |
| राजेश अमृतकर | उपशिक्षक | मनपा शाळा क्र.१०७ |
| सय्यद मिरसनजनअली | उपशिक्षिका | विद्यानिकेतन १० |
| विठ्ठल नागरे | उपशिक्षक | मनपा शाळा क्र.३६ |
| जयराम महाजन | उपशिक्षक | मनपा शाळा क्र.७० |
| गीता हिरे | उपशिक्षिका | मनपा शाळा क्र.३७ (हिंदी माध्यम) |
| पौर्णिमा पंडित | मुख्यध्यापिका | नवभारत प्राथमिक विद्यामंदिर |
| चारूदत्त सोनवणे | उपशिक्षक | छत्रपती शिवाजी विद्यालय, सातपूर |
| राजेश भुसारे | उपशिक्षक | डे-केअर प्राथमिक शाळा |
| हरिकृष्ण सानप | मुख्याध्यापक | आदर्श विद्यामंदिर, बळीमंदिर |
| रोहिणी जोशी | मुख्याध्यापिका | जेम्स इंग्लिश स्कूल, हिरावाडी |
| पौर्णिमा पटेल | उपशिक्षिका | गोदावरीबाई प्राथमिक (गुजराथी माध्यम) |
| आरेक मुनिसा शफीक | उपशिक्षक | अंजुमन उर्दु प्राथमिक शाळा |

## लवकरच पालिका रूग्णालयात २३ इन्क्युबेटर : आयुक्त

**नाशिक** : महापालिकेने आपल्या रूग्णालयांमध्ये नव्याने २३ इन्क्युबेटरची व्यवस्था करण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. महापालिका प्रसुतीगृह रूग्णालयात दाखल असलेल्या शिशुंना जिल्हा रूग्णालयात पाठविल्यास यापुढे वैद्यकिय अधिकारी, निवासी वैद्यकिय अधिकाऱ्याचे निलंबन करून कठोर करावाई करण्याचा इशारा मनपा आयुक्त अभिषेक कृष्णा यांनी वैद्यकिय विभागाला दिला.

मनपा रूग्णालयात सध्या १७ इन्क्युबेटर कार्यरत आहेत. त्यात आता २३ ने वाढ केली जाणार आहे. महापालिका क्षेत्रातील बहुतांशी रूग्ण जिल्हा रूग्णालयात येत असल्याने जिल्हा रूग्णालयावरील ताण वाढल्याचे स्पष्टीकरण केल्यानंतर आता बाल मृत्यु रोखण्यासाठी महापालिकेने तातडीने उपाय योजना करण्यासाठी पाऊले उचलण्यात यासंदर्भात माहिती देतांना आयुक्त अभिषेक कृष्णा म्हणाले, नव्याने २३ इन्क्युबेटर वैद्यकिय विभाग किंवा महिला बालकल्याण समितीच्या फंडातून खरेदी केली जाणार असून महिनाभरात ही प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे. अशा प्रकारे एकूण महापालिकेच्या रूग्णालयात ४० इन्क्युबेटर उपलब्ध केले जाणार आहे. यांचा फायदा रूग्णांना होणार आहे. यामुळे इन्क्युबेटर वाढीनंतर महापालिकेच्या रूग्णालयातून इन्क्युबेटर काहीना शिशुला कारण नसतांना पाठविण्याची शिफारस केल्यास संबंधित वैद्यकिय अधिकारी




आणि निवासी वैद्यकिय अधिकारी यांना निलंबित करण्या बरोबरच कठोर कारवाई केली जाईल असे आयुक्त अभिषेक कृष्णा यांनी स्पष्ट केले.

| अ. क्र. | रूग्णालय | सध्या इन्क्युवेटर | नवीन इन्क्युबेटर | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | बिटको रूग्णालय, ना.रोड | १० | ३ | १३ |
| २ | डॉ.हुसेन रूग्णालय, कथडा | ४ | ४ | ८ |
| ३ | इंदिरा गांधी रूग्णालय, पंचवटी | २ | ६ | ८ |
| ४ | स्वामी समर्थ रूग्णालय, मोरवाडी | १ | ६ | ७ |
| ५ | मायको रूग्णालय | | २ | २ |
| ६ | जिजामाता प्रसुतीगृह | | २ | २ |
| | एकुण | १७ | २३ | ४० |

सर्व छायाचित्र : संतोष कान्हे, विरसिंग कामे

स्मार्ट नाशिक सिटी
नाशिक महानगरपालिका खाजगी प्रकाशन
संपादित व प्रकाशित : अभिषेक कृष्णा आयुक्त,
अतिरिक्त आयुक्त रमेश पवार, उपायुक्त हरिभाऊ फडोळ
संपादकीय समन्वयक : चेतन श्रीराम घरटे (ग्लोबल सेलोरा सिस्टम)